| | नवी मुंबई महानगरपालिका | NAVI MUMBAI MUNCIPAL CORPORATION |
|---|---|---|
| | पामबीच जंक्शन, भुखंड क्र.1 सेक्टर.15, सी.बी.डी, बेलापूर नवी मुंबई -400 614 दुरध्वनी क्रमांक : 2756 7181 /60 /61 | Palm Beach Junction, Plot No. 1 Sector-15 A, C.B.D., Belapur NAVI MUMBAI - 400 614 |

<u>अत्यंत महत्वाचे / तातडीचे</u>

जा.क्र.नमुंमपा/आ.व्य/ 277 /2021.
दिनांक : 05 / 06 / 2021

# <u>आदेश</u>

**विषय : कोविड-19 मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करणेसाठी नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये "Levels of Restrictions for Break The Chain" अंतर्गत शासनाने जाहीर केलेले सुधारीत निर्बंध दिनांक 07 जून, 2021 पासून लागू करणेबाबत.**

**संदर्भ :**
1) आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005.
2) भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम,1897
3) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्र.डीएमयू-2020/सीआर-92/Dism-1, दिनांक. 13 एप्रिल 2021.
4) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./150/2021 दिनांक 14/04/2021.
5) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्र.डीएमयू-2020/सीआर-92/Dism-1, दिनांक. 29 एप्रिल 2021.
6) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./187/2021 दिनांक 30/04/2021.
7) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्र.डीएमयू-2020/सीआर-92/Dism-1, दिनांक. 12 मे 2021.
8) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./218/2021 दिनांक 14/05/2021.
9) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्र.डीएमयू-2020/सीआर-92/Dism-1, दिनांक. 30 मे 2021.
10) मा. जिल्हाधिकारी व दंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडील जा.क्र.जिकाठा/जि.आ.नि.कक्ष/Break the chain-7/21 दि.31/05/2021 रोजीचे आदेश.
11) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./265/2021 दिनांक 31/05/2021.
12) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./271/2021 दिनांक 01/06/2021.
13) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./273/2021 दिनांक 02/06/2021.
14) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्र.डीएमयू-2020/सीआर-92/Dism-1, दिनांक. 04 जुन 2021.

**ज्याअर्थी,** नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत 'ब्रेक-द-चेन' अंतर्गत कोविड-19 विषाणूच्या संसर्गाची साखळी खंडीत करणेच्या दृष्टीने उक्त संदर्भ क्र.11 च्या आदेशान्वये, संपूर्ण राज्यामध्ये मंगळवार, दिनांक 01 जून 2021 रोजी सकाळी 7.00 वाजल्यापासून ते दिनांक 15 जून 2021 रोजी सकाळी 7.00 वाजेपर्यंत संपूर्ण शहरामध्ये राज्य शासनाकडील उक्त संदर्भ क्र.9 च्या आदेशास अनुसरुन यापूर्वी दिलेल्या निर्बंधासह नव्याने लागू करण्यात आलेल्या अतिरिक्त निर्बंधाची काटेकोरपणे अंमलबजावणी सुरु ठेवणेबाबत आदेश निर्गमित केलेले आहेत.

**ज्याअर्थी,** मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी उक्त संदर्भ क्र.14 च्या आदेशान्वये, सद्यस्थितीत लागू असलेल्या निर्बंधामध्ये बदल करुन दिनांक 07 जून, 2021 पासून सुधारीत निर्बंध लागू करण्यात आलेले आहेत, आणि नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये शासन आदेशास अनुसरुन काही निर्बंध यापुढेही लागू ठेवण्याची आवश्यकता असल्याची माझी खात्री झाली आहे.

**ज्याअर्थी,** सन 2011 च्या जनगणनेनुसार 10 लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या सर्व महानगरपालिकांना कोरोना संसर्गाला रोखण्यासाठी स्वतंत्र प्रशासकीय घटक म्हणून शासनाने घोषित केले आहे. आणि

**ज्याअर्थी,** पॉझिटिव्हिटी रेट व ऑक्सिजन बेड ऑक्युपन्सी या प्रमाणावर आधारित विविध आर्थिक व सामाजिक ॲक्टीव्हिटीजबाबत शासनाने संदर्भ क्र.14 अन्वये 05 स्तर (05 Levels) जाहीर केले आहेत. संबंधित स्वतंत्र प्रशासकीय घटक व त्यांना लागू असलेला स्तर विचारात घेऊन निर्बंध शिथिल करण्याबाबत शासनाचे आदेश आहेत. आणि

**ज्याअर्थी,** असे निदर्शनास आले आहे की, दिनांक 03 जून 2021 रोजीचा आठवडा संपताना नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पॉझिटिव्हिटी रेट व बेड ऑक्युपन्सीचे प्रमाण हे उक्त शासन संदर्भ क्र.14 नुसार "लेव्हल 2" या गटामध्ये समाविष्ट आहे.

**त्याअर्थी**, नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील हॉटस्पॉट क्षेत्रामधील COVID-19 चा प्रादुर्भाव पाहता, साथरोग नियंत्रण अधिनियम, 1897 च्या कलम 2 अन्वये, तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 च्या सर्व संबंधित तरतूदींसह प्राप्त अधिकारांचा वापर करुन, **मी अभिजीत बांगर, आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, या आदेशान्वये नवी मुंबई क्षेत्रामध्ये Levels of Restrictions for Break The Chain अंतर्गत "स्तर -2 (Level-2)" नुसार दि. 07 जून, 2021 रोजी सकाळी 7.00 पासून ते दि.14 जून 2021सकाळी 7.00 पर्यंत खालील सुधारीत निर्बंध लागू राहतील, असे जाहीर करीत आहे.**

1) अत्यावश्यक वस्तू व सेवांची सर्व दुकाने नियमित वेळेत सुरु राहतील.
2) अत्यावश्यक गटात नसलेली सर्व दुकाने नियमित वेळेत सुरु राहतील.
3) मॉल, सिनेमा थिएटर, मल्टिप्लेक्स, सिंगल स्क्रिन, नाट्यगृहे त्यांच्या एकूण क्षमतेच्या 50 टक्के क्षमतेने नियमित वेळेत सुरु राहतील.
4) शहरातील सर्व रेस्टॉरन्ट्स त्यांच्या एकूण आसन क्षमतेच्या 50 टक्के क्षमतेने नियमित वेळेत सुरु राहतील.
5) उपनगरीय लोकल रेल्वे वाहतूक सेवा केवळ वैद्यकीय व अत्यावश्यक सेवांसाठीच सुरु राहतील.
6) सार्वजनिक ठिकाणे, मोकळी मैदाने, वॉकींग ट्रॅक, सायकलिंग इत्यादी ॲक्टिव्हिटीज नियमित वेळेत सुरु राहतील.
7) सर्व शासकीय व खाजगी कार्यालये 100 टक्के क्षमतेने सुरु राहतील.
8) क्रीडा विषयक बाबी इनडोअर खेळांसाठी सकाळी 5.00 ते 9.00 व सायंकाळी 5.00 ते 9.00 या वेळेत सुरु राहतील. तसेच आऊटडोअर खेळांसाठी पूर्ण दिवस परवानगी राहील.

9) चित्रीकरणाची (Shooting) कामे नियमित सुरु राहतील.

10) सामाजिक, सांस्कृतिक व मनोरंजनाचे कार्यक्रम एकूण आसन क्षमतेच्या 50% क्षमतेने सुरु राहतील.

11) विवाह समारंभातील उपस्थिती ही 50 व्यक्तींपेक्षा जास्त अनुज्ञेय राहणार नाही.

12) अंत्यविधीसाठी उपस्थिती ही 50 व्यक्तींपेक्षा जास्त अनुज्ञेय राहणार नाही.

13) बांधकामे नियमित वेळेत सुरु राहतील.

14) शेती विषयक कामकाजे नियमित वेळेत सुरु राहतील.

15) ई कॉमर्स, साहित्य व सेवा पुरवठा नियमित वेळेस सुरु राहतील.

16) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात जमावबंदी लागू राहील.

17) जिम, सलॉन्स, ब्युटी पार्लर, स्पा, वेलनेस सेंटर्स पूर्वनियोजित भेटीची वेळ ठरविणे (Appointment Basis) या तत्वावर 50 % क्षमतेने सुरु राहतील.

18) सार्वजनिक बस वाहतूक आसन क्षमतेप्रमाणे सुरु राहतील. बसमध्ये उभे राहून प्रवास करणेस परवानगी असणार नाही.

19) माल वाहतूक करणाऱ्या वाहनांसाठी चालक /हेल्पर/ क्लिनर किंवा इतर अशा 03 व्यक्तींनाच प्रवाशांसाठी लागू असलेल्या सर्व अटींसह प्रवास करण्यास परवानगी असेल.

20) आंतर जिल्हा प्रवासासाठी खाजगी कार्स, टॅक्सी, बस व लांब पल्ल्यांच्या रेल्वे गाड्यांमधून नियमित प्रवास करता येईल. परंतू अशा गाड्या स्तर 5 मधील जिल्हा / शहर यामध्ये थांबणार नाहीत, किंवा स्तर-5 मधील जिल्हा / शहरामध्ये जाणेसाठी किंवा तेथून येण्यासाठी इ- पास आवश्यक राहील.

21) माल निर्यात करणाऱ्या उत्पादन कंपन्या नियमित वेळेत सुरु राहतील.

22) आवश्यक माल, कच्चा माल व आवश्यक मालासाठी पॅकींग करणाऱ्या कंपन्या नियमित वेळेत सुरु राहतील. तसेच उत्पादन लगेच थांबविणे शक्य नाही अशा निरंतर उत्पादन करणाऱ्या कंपन्या, राष्ट्रीय सुरक्षा आणि संरक्षणासाठी आवश्यक उत्पादन करणाऱ्या कंपन्या, डाटा सेंटर्स, कॉल सेंटर्स व आय.टी.सेवा या नियमित वेळेत सुरु राहतील.

23) ज्यांचा आवश्यक, निरंतर व निर्यात उत्पादनात समावेश नाही अशी सर्व उत्पादन केंद्रे नियमित वेळेत सुरु राहतील.

उक्त आदेशाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती / संस्था यांचेवर साथरोग अधिनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 51 ते 60 अन्वये तसेच, भारतीय दंड संहिता यामधील कलम 188 अन्वये कारवाई केली जाईल.

**सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.**

05/06/21

**( अभिजीत बांगर)**
**आयुक्त**
**नवी मुंबई महानगरपालिका**

प्रत :

1. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
2. मा. पालकमंत्री ठाणे तथा मंत्री नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
3. मा. मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य. अधिकारी.
4. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
5. मा. पोलीस आयुक्त, नवीमुंबई.
6. जिल्हाधिकारी, ठाणे.
7. अतिरिक्त आयुक्त -1 आणि 2 नमुंमपा.
8. उप आयुक्त (मुख्यालय) आणि उप आयुक्त- परिमंडळ 1 व 2, नमुंमपा.
9. वैदयकिय आरोग्य अधिकारी, नमुंमपा.
10. सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी (सर्व 8 विभाग कार्यालय), नमुंमपा.